श्रमिक एकजूट दि १३/०३/२०२३

# जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना नांदेड ग्रामीण पोलीसांनी केले जेरबंद



नवीन नांदेड (प्रतिनिधी)-ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील घरी जात असलेल्या दोन व्यक्तींनां खुदबेनगर चौरस्ता येथे संगनमत करुन खिशातील एक हजार रुपये बळजबरीने काढून घेत असतांना आरडाओरडा करीत असतांना यातील दोन आरोपी पळून गेले व एक आरोपी सापडला असून सदरील गुन्हेगार कडून त्याचा पिशवीत बाळगत असलेले १३ जुने वापरते मोबाईल आढळून आले असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून १३ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत, एकुण एक दुचाकी मोटार सायकल व जबरी चोरी मधील एक हजार असा १ लाख ८६ हजार रुपये मुद्देमाल जप्त केला असून वरीष्ठ अधिकारी यांनी ग्रामीण पोलीसाचे अभिनंदन केले आहे.

या प्रकरणी पोलीसांनी प्रसिद्धी केलेल्या पत्रकानुसार,पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हददीत दिनांक १२ मार्च २३ रोजी रात्री ९.०० वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी नामे सय्यद इमरान अली पि. सय्यद यासीन अली वय ४८ वर्ष व्यवसाय - इलेक्ट्रिशीयन रा. किल्ला रोड, नांदेड हे त्यांचे मित्र शेख रियाज सोबत त्यांच्या कामानिमीत्य बाफना येथून घरी जात असताना खुदबे नगर चौरस्ता येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन मोटारसायकल क्रमांक १५ १६ त्र्यए ७४२५ यावर बसून आले. तेथे फिर्यादीस थांबण्यास सांगुन त्या तिघा आरोपीतांनी फिर्यादीचे खिशातील १००० रुपये बळजबरीने काढून घेत असताना फिर्यादी व त्यांचे मित्राने त्यांना धरुन आरडाओरड केल्याने यातील दोन आरोपी पळून गेले व एक आरोपी सापडला.

तसेच सदर आरोपीने त्याच्या सोबत बाळगलेल्या पिशवीत वेगवेगळ्या कंपनीचे चौरीचे १३ जुने वापरते मोबाईल आढळून आल्याने सदर फिर्यादींनी पोलीसांच्या मदतीने पोलीस स्टेशनला हजर करून विचारपुस केली असता, सदर आरोपीचे नाव सय्यद करीम सय्यद पिर अहमद वय २३ वर्ष, रा. जल्लापल्ली ता.कोटागिरी जि.निझामाबाद राज्य तेलंगाणा असून त्याच्या सोबत इतर ०२ आरोपी असल्याचे सांगितले.तसेच सदर अ सदर फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन नदिड ग्रामीण गु.र.न. १७०/२०२३ कलम ३९३, ३४ भा.द.वि. प्रमाणे दाखल करण्यात आला असुन सदर चोरीचे १३ मोबाईल जु.वा. किंमत अंदाजे १.३५,०००/- व ०१ मोटारसायकल किमत अंदाजे ५०,०००/- व जबरी चोरी करण्याचा प्रयत्न केलेले नगदी १०००/- असा एकुण १,८६,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक अशोक घारेबांड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक माणिकराव हंबडे करत आहेत.

तपासादरम्यान आरोपी नामे सय्यद करीम सय्यद पिरअहमद वय २३ वर्ष, रा. जल्लापल्ली ता. कोटागिरी जि. निझामाबाद राज्य तेलंगाणा, २ अफरोजखान पि.ईसाखान वय २३ वर्ष रा. तुर्रब नगर, देगलुर नाका यास पोलीसांनी पकडले असून उर्वरीत आरोपीतांचा शोध चालु आहे. जप्त करण्यात आलेले मोबाईल चे खचएख छज. वरुन मुळ मालकांचा शोध घेवून त्यांना त्यांचे मोबाईल सन्मानपूर्वक परत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर कामगिरी करणारे पोलीस निरीक्षक अशोक घारेबांड व त्यांच्या टिममधील पोउपनिरीक्षक माणिकराव हंबर्डे, पोउपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ जाधव, पोकॉ उमर शेख, पोकॉ शिवानंद कानगुले या सर्वांचे श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक नांदेड, अबिनाश कुमार, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड व डॉ. सिध्देश्वर भोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग इतवारा जि.नांदेड यांनी विशेष अभिनंदन केले आहे.